**वाचले**:-१. भूमिसंपादन पुनर्वसन व पुनर्स्थापना करताना वाजवी भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क अधिनियम २०१३ कलम ८(नियम ८(२))

२. महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण भाग चार-अ, दि. १९ जानेवारी २०१५

३. उपविभागीय अधिकारी अलिबाग यांचेकडील पत्र क्रमांक उविअ/कात-२/भूसंपादन/चेंढरे/जाहिरात प्रसिध्दी/एसआर.१/२०१५/२०१८ दि.२६.२.२०१८

४. कार्यालयीन मंजूर टिपणी दि.१५/०५/२०१८

---

क्र.भूसंपादन/का-२/तज्ञगट/शिफारस/चेंढरे/२०१८
जिल्हाधिकारी कार्यालय रायगड (भूसंपादन शाखा)
अलिबाग दि.१५ /०५/२०१८

**आदेश**

ज्याअर्थी, भूमिसंपादन पुनर्वसन व पुनर्स्थापना करताना वाजवी भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क अधिनियम २०१३ कलम ७ नुसार स्थापन करण्यात आलेल्या तज्ञ गटाने अलिबाग तालुक्यातील मौजे चेंढरे येथील ०.२३.३८ हे.आर क्षेत्र **पोलीस दलासाठी संपादन** प्रस्तावात सामाजिक परिणाम निर्धारण अभ्यास अहवालावर शिफारसी पाठविलेल्या आहेत.

त्याअर्थी, उक्त अधिनियमाच्या कलम ८ प्रमाणे **समुचित शासनाने** सामाजिक परिणाम निर्धारण अभ्यास अहवाल व सामाजिक परिणाम व्यवस्थापन योजना व तज्ञ गटाच्या शिफारशी यांचा विचार करुन मौजे चेंढरे येथील क्षेत्र **पोलीस दलासाठी** संपादन या प्रकल्पासाठी जमिनीची आवश्यकता असल्याचा निर्णय समुचित शासन तथा जिल्हाधिकारी रायगड म्हणून खालील बाबींचा विचार करुन घेतला आहे.

अ. प्रयोजिक संपादन हे कायदेशीर व सार्वजनिक प्रयोजनाच्या हिताचे असून संपादनासाठी जमिनीची आवश्यकता आहे.

आ. प्रकल्पाचे सामाजिक फायदे हे सामाजिक दृष्टया व प्रतिकुल सामाजिक प्रभाव यापेक्षा जास्त महत्वाचे आहे.

इ. प्रायोजित प्रकल्पासाठी आवश्यक तितकेच जमिनीचे संपादन करण्यात येणार आहे.

ई. यापूर्वी संपादन केलेली परंतू न वापरलेली जमिन उपलब्ध नाही.

उ. भूसंपादन हे सार्वजनिक प्रयोजनासाठी आहे.

(डॉ.विजय सुर्यवंशी)
**जिल्हाधिकारी रायगड**

प्रत:-

१.मा.सचिव वने महसूल व वन विभाग,मंत्रालय, मुंबई यांचेकडे माहितीसाठी सविनय सादर

२.उपविभागीय अधिकारी अलिबाग यांस माहितीसाठी व पुढील जरुर त्या कार्यवाहीसाठी.